# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.७४ दिनांक ०२/०८/२०२१

## स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचेकडुन अवैद्य दारु वाहतुक करणा-या आरोपीतावर कारवाई

दिनांक ३१/०७/२०२१ रोजी १२.४५ वा.चे सुमारास धुंदलवाडी नाक्याजवळ करजगांवकडे जाणारे रोडलगत ता.डहाणु, जि.पालघर येथे प्रोव्हीबिशन गुन्हयांचा माल विक्री करिता बाळगुन वाहतुक करीत असल्याची गुप्त बातमी स्थानिक गुन्हे शाखेच्या बोईसर युनिटला मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर ठिकाणी छापा टाकला असता यातील दोन आरोपीत इसम हे वेगवेगळया कंपणीच्या देशी व विदेशी प्रोव्हीबिशन गुन्हयाचा माल बेकायदेशिररीत्या विक्री करण्याकरीता विना परवाना बाळगुन वाहतुक करीत असतांना मिळून आले. आरोपीत याचे ताब्यातुन खालील प्रमाणे मुद्देमाल मिळुन आला. १) ६,०४,८००/--रु.कि.चे रॉयल स्टॅग व्हिस्कीचे एकुण ७० बॉक्स. प्रत्येक बॉक्समध्ये १८० मिलीलिटर काचेच्या ४८ बाटल्या. २)२,३०,४००/-रु.कि.चे मॅजिक मुव्हमेंट ओडका एकुण २४ बॉक्स. प्रत्येक बॉक्समध्ये १८० मिलीलिटर काचेच्या ४८ बाटल्या. ३)३,९०,०००/-रु.कि.चे मॅजिक मुव्हमेंट रिमीक्स प्लेवर ओडका एकुण २५ बॉक्स. ४)७,९२,०००/-रु.कि.चे ब्लेंडर स्प्राईड व्हिस्कीचे एकुण ४८ बॉक्स. प्रत्येक बॉक्समध्ये ७५० मिलीलिटर काचेच्या १२ बाटल्या. ५)६९,६००/-रु.कि.चे.ब्लेंडर स्प्राईड रिझर्व्ह कलेक्शन व्हिस्कीचे एकुण ०४ बॉक्स. प्रत्येक बॉक्समध्ये ७५० मिलीलिटर च्या काचेच्या १२ बाटल्या. ६)३५,४००/- रु.कि.चे ब्लॅग डॉग ट्रिपल गोल्ड रिझर्व्ह व्हिस्कीचे एकुण १ बॉक्स. प्रत्येक बॉक्समध्ये ७५० मिलीलिटर काचेच्या १२ बाटल्या. ७)२८,८००/-रु.कि.चे ब्लॅग डॉग ब्लॅक रिझर्व्ह व्हिस्कीचे एकुण १ बॉक्स. त्यात ७५० मिलीलिटर काचेच्या १२ बाटल्या ८)६,२२,०८०/-रु.कि.चे. रॉयल स्टॅग क्लासीक व्हिस्कीचे एकुण ७२ बॉक्स. प्रत्येक बॉक्समध्ये ७५० मिलीलिटर काचेच्या १२ बाटल्या. प्रत्येक बाटली ७२०/- रु. किमंतीची ९)१,६२,०००/-- रु.कि.चे. हायवर्ड ५००० सुपर स्ट्रॉंग बियरचे ४५ बॉक्स. त्यात प्रत्येकी ५०० मिलिलीटरचे २४ टिन. १०)९,००,०००/-रु.कि.चा. एक आयसर टेम्पो क्रमांक जीजे-०४/डब्लु-५६२१. त्याचा चेसीस नंबर. C233HRC0DA079039 व इंजिन नंबर E483CDDA 601265 असा असलेला चावीसह चालु स्थितीत. असा एकुण ३८,३५,०८०/-रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचे आरोपीत यांचे विरुद्ध तलासरी पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र.III १५५/२०२१ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे, गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई ही पोउपनि आशिष पाटील, स्थानिक गुन्हे शाखा, बोईसर व स्थानिक गुन्हे शाखा, बोईसर नेमणुकीतील पोलीस अमंलदार यांनी केली आहे.